कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी)
(गट-क) या पदावर सरळसेवा नियुक्ती आदेश

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक. साप्रवि२/ग्रापं१/१८/२०२५
दिनांक: १९/०३/२०२५

वाचा : १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अनिओ/१००५/१२६/सेवा-४, दि ३१-१०-२००५.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ, दिनांक १९-१०-२००७.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरकव्ह-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २८/०२/२०१३.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ, दिनांक २७-६-२००८.
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ, दिनांक ५-६-२०१४
७. शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.क्र.एपिटी-२०१४/प्र.क्र.१३९/आस्था-८, दिनांक ५-७-२०१४.
८. शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दि.१३ जून २०१८
९. अमुजा-२०२१/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२ एप्रिल २०१८
१०. शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४ मे २०२२
११. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था८, दि.१५ नोव्हेंबर २०२२.
१२. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था ८,दि. १५ मे २०२३.
१३. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र.८६/आस्था७, दि.१८ जुलै २०२३.
१४. जिल्हा निवड समिती अहिल्यानगर निवडीसाठी केलेली शिफारस दि.२८/०२/२०२५

आदेश :-

जिल्हा निवड समिती / जिल्हा परिषद निवड समिती अहिल्यानगर कडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (गट-क) कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) या पदावर दरमहा रूपये १६०००/- एकत्रित वेतन आणि नियमित ग्रामसेवकाप्रमाणे (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) प्रवासभत्ता वर नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदावर करण्यात येत आहे. याखेरीज इतर कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव व पत्ता | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्ती व पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्रीम काजल पांडुरंग भोजने, मु.पिंपळदरावाडी, पो.एकदरे ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन - ४२२६०१ | अनुसूचित जमाती-महिला | पं.स. श्रीगोंदा |

उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१. उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आत हजर व्हावे. उमेदवार मुदतीच्या आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास नियुक्तीचा हक्क रद्द होईल.
२. सदरची नियुक्ती निव्वळ तातपुरत्या स्वरुपातील आहे. अर्जदाराने सरळसेवा भरती प्रकरणी सादर केलेले कागदपत्र बनावट अथवा खोटी असल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास,सदरची नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल.
३. माजी सैनिक ऐवजी नियुक्ती देण्यात आलेल्या उमेद्वारांसंदर्भात भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद अथवा न्यायालयीन वाद उदभवल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
४. नेमणुकीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
५. उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना पूर्व नोटिस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन जिल्हा परिषद निधीत / शासन खाती जमा करावे लागेल.
६. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून वैद्यकिय तपासणी अंती पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देण्यात येत आहे. (कारण ही कार्यवाही नियुक्ती प्राधिका-याने करून घेणे बंधनकारक आहे.)
७. गट-क मधील उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ८ नुसार शासनाने विहित केलेली, तसेच वेळोवेळी विहित केल्या जातील अशा विभागीय परीक्षा/ भाषा परीक्षा / प्रशिक्षण अर्हता विहित संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील. प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा (सेवाप्रवेशोत्तर परीक्षा) चार वर्षात व ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.
८. उमेदवारास संदर्भीय शासन निर्णय दिनांक ३१-१०-२००५ मधील सूचनांनुसार नवीन परिक्षाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तसेच भविष्य निर्वाह निधी, अंशराशीकरण इत्यादी संबंधित वेळोवेळी दिलेले आदेश / निर्णय / परिपत्रके यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९. संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.
१०. उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलिस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहील. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
११. उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८ मार्च, २००५ आणि शासन परिपत्रक दिनांक १ जुलै, २००५ मधील नमूद, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीचे पालन करणे बंधकनकारक राहील.
१२. सदर आदेशाचे नियुक्ती दिल्यानंतर संबंधिताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.
१३. ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय संकीर्ण-२०२३/प्र.क्रं.८६/आस्था-७ दि.१८ जुलै २०२३ मधील तरतुदीनुसार आपणास दरमहा रुपये १६०००/- एकत्रित वेतन तसेच नियमित ग्रामसेवकाप्रमाणे (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) कायम प्रवास भत्ता देण्यात येईल. या खेरीज इतर कोणतेही वित्तीय लाभ आपणास अनुज्ञेय असणार नाही. सार्वजनिक सुट्ट्या व दोन महिन्याच्या सेवेसाठी एक नैमित्तिक रजा किंवा एक कॅलेंडर वर्षात ६ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील. तसेच महिला कर्मचा-यास प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय राहिल.प्रत्येक महिन्यातील

सार्वजनिक सुट्ट्या व्यतिरिक्त, नैमित्तिक रजा व प्रसुती रजा व्यतिरिक्त अनुपस्थित असेल तेवढी रक्कम आपले महिन्याचे मानधनातुन कापून घेण्यात येईल.

१४. नियुक्तीपूर्वी आपणास सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/- एवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे भरावी लागेल व दोन प्रतिष्ठित व्यक्तीचे जामिनपत्र लिहुन द्यावे लागेल.

१५. नियुक्ती कालावधीत आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक नाही. तथापि आपली नियुक्ती रद्द करण्याविरुध्द आपणास विभागीय आयुक्त यांचेकडे अपिल करता येईल.चौकशीत आर्थिक गैरव्यवहार आढळून आपणास जिल्हा परिषदेच्या आर्थिक नुकसानीएवढी रक्कम आपण दिलेल्या सुरक्षा ठेवीमधून वसूल करण्यात येईल आणि त्यापेक्षा गैरव्यवहाराची रक्कम अधिक असल्यास आपल्याकडून/जामिनदाराकडून वसूल करण्यात येईल.

१६. विवाहित असल्यास तुम्हाला एकच पती/पत्नी आहे असे गृहित धरुन नियुक्ती देण्यात येत आहे.एकापेक्षा जास्त पती अगर पत्नी असल्याचे निदर्शनास आल्यास तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यांसह जन्मतारीख घोषित करील. जेव्हा नियुक्तांची विहित शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परीक्षा हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल, इतर बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवार जन्म तारखेचे परिशिष्ठ -५ अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड ब मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षीच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

१८. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रएसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १/७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमदेवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे.सदर नियमानुसार दिनांक २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवाराची नियुक्त रद्द करण्यात येईल.

१९. शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असले बाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्याचेकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२०. सदर कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तक भरतांना खालील कागदपत्रे डकविण्यात यावीत. ती डकविण्यात आलेली आहेत किंवा नाही? या बाबतची खात्री स्वत: करुन घ्यावी.-१.शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र, २.मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला, ३.स्वग्राम घोषणा पत्र, ४.शैक्षणिक अर्हता.

२१. महाराष्ट्र शासन,वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.रानियो-२०२२/प्र.क्रं.३४/सेवा-४ दिनांक ३१.०३.२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृतीयोजना/राष्ट्रीय निवृतीवेतन प्रणाली अंतर्गत

कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास,त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृतीवेतनआणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत झालेल्या कर्मचा-यांला रुग्णता निवृतीवेतन आणि सेवानिवृती उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृती उपदान लागु होईल.त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसांत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल.

२२. नियुक्ती दिलेल्या पदास स्थायीत्व प्रमाणपत्र मिळालेनंतरच आपणास आंतरजिल्हा बदलीकरिता शासन निर्णय दि.२९ सप्टेंबर २०११ मधील तरतुदीनुसार व प्रचलित शासन निर्णयानुसार तसा अर्ज प्रशासनाकडे करता येईल.

२३. सदर पदावर रजु झालेचे दिनांकापासुन ३ महिन्यांचे आंत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय क्रं.वशिअ/१२१४/प्र.क्रं.२६/११ दिनांक २.०६.२०१४ नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व असेटस एण्ड लायबीलिटीज याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202503190600008 असा आहे.

(आशिष येरेकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) श्रीम काजल पांडुरंग भोजने, मु. पिंपळदरावाडी,पो.एकदरे, ता.अकोले, जि. अहिल्यानगर ४२२६०१

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- श्रीगोंदा -----

२/- आदेशात नमुद अटी व शर्तीनुसार पूर्तता करून उमेदवाराची सर्व मूळ प्रमाणपत्राची पडताळणी करून सदर उमेदवार कामावर रूजू करून घेवून अहवाल सादर करावा.

प्रत कार्यवाहीसाठी

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद अहिल्यानगर

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१) अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अहिल्यानगर

(आशिष येरेकर,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर